# कृषि पणन विषयक बातम्या : एप्रिल 2022

Agrowon Dt. 24/04/2022



पुणे : राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने मार्केट यार्ड परिसरात आयोजित आंबा महोत्सवाला पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी शुक्रवारी (ता.२२) भेट दिली.

## थेट शेतकऱ्यांकडून दर्जेदार हापूस खरेदी करा : पाटील

### पुण्यातील मार्केट यार्डातील आंबा महोत्सवाला भेट

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : ‘‘कोरोनाची दोन वर्षे शेती आणि शेतकऱ्यांसाठी अडचणीची गेली. त्यानंतर या वर्षी होत असलेल्या आंबा महोत्सवातून ग्राहकांनी थेट शेतकऱ्यांकडून दर्जेदार हापूस खरेदी करावा’’, असे आवाहन पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने मार्केट यार्ड परिसरात आयोजित आंबा महोत्सवाला मंत्री पाटील यांनी शुक्रवारी (ता. २२) भेट दिली. या वेळी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक आणि पणन संचालक सुनील पवार, पणन सहसंचालक विनायक कोकरे, पुणे बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड, पणन मंडळाचे सहाय्यक सरव्यवस्थापक मंगेश कदम उपस्थित होते.

मंत्री पाटील यांनी शेतकऱ्यांसोबत संवाद साधत आंबा उत्पादन, विपणन आणि निर्यातीबाबत चर्चा केली. पाटील म्हणाले,‘‘ कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे ‘उत्पादक ते ग्राहक थेट विक्री’ योजनेअंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मात्र कोरोनामुळे मागील वर्षी महोत्सव झाला नाही. या वर्षी आयोजनामुळे शेतकरी आणि ग्राहकांना फायदा होत आहे.’’ ‘‘महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड जिल्ह्यांतील ६२ हापूस आंबा उत्पादक सहभागी आहेत. पुढे केसर आंबा उत्पादकही सहभागी होतील. या वर्षी सुमारे ५१ स्टॉल आंबा उत्पादकांना दिले. महोत्सव ३१ मे अखेरपर्यंत असेल,’’ असे पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार म्हणाले.

दै. "पुढारी" दि. २३/४/२०२२.

# 'सुगीपश्चात तंत्रज्ञान' शिखर प्रशिक्षण संस्था

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेस (तळेगाव, ता. मावळ, जि. पुणे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांन्वये राज्य शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे.

प्रशिक्षणाबाबतचा तिमाही अहवाल सहकार आयुक्तांना सादर करणे अपेक्षित असून शासनासही अहवालाची एक प्रत देण्याबाबतच्या सूचना आदेशात देण्यात आलेल्या आहेत.महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० च्या कलमांन्वये प्रत्येक संस्था ही राज्य संघीय संस्थांमार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांमार्फत आपले संचालक, सदस्य, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील अशी तरतूद आहे. सभासदांना पाच वर्षामध्ये किमान एकदा प्रशिक्षण देणे बंधनकारक आहे. याचा विचार करून राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेस राज्य शिखर प्रशिक्षण संस्थेचा दर्जा देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्तालयाने शासनास दिला होता.

"

राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेत २५० व्यक्ती क्षमतेचे वसतिगृह, सुसज्ज लायब्ररी, स्वच्छ भोजनगृह, आधुनिक क्लासरूम या सुविधा उपलब्ध आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय भागीदारीतून उभारलेले सेंटर ऑफ एक्सलन्स, शीतगृह इत्यादी सुविधा सुमारे १५० एकरवरील निगर्सरम्य परिसर असलेल्या या तंत्रज्ञान संस्थेत दर्जेदार प्रशिक्षण दिले जाईल. आजपर्यंत संस्थेने २० देशांतील प्रशिक्षणार्थींसह एकूण ५० हजार लोकांना प्रशिक्षण दिले आहे.

**- सुनील पवार,**
कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.

दै. "पुढारी" दि. २३/४/२०२२.

# हापूस खरेदीचा ग्राहकांनी लाभ घ्यावा




आंबा महोत्सवास भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधताना पणनमंत्री बाळासाहेब पाटील. समवेत सुनील पवार, विनायक कोकरे व अन्य मान्यवर.

**सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांचे आवाहन**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोकणातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक पद्धतीने हापूस आंबा पिकविलेला आहे. शेतकरी ते थेट ग्राहक विक्रीअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आंबा महोत्सवात शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात दर्जेदार आंबा उपलब्ध करून देण्यात आला असून, ग्राहकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले आहे.

पुढील पंधरवड्यात केशर आंब्यांचीही उपलब्धता होत असल्याचे ते म्हणाले.

राज्य कृषी पणन मंडळामार्फत मार्केट यार्डच्या प्रवेशद्वार क्रमांक ९ येथील पीएमटी बस डेपोसमोरील वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेत आंबा महोत्सव सुरू करण्यात आला आहे. त्यास शुक्रवारी (दि.२२) सहकारमंत्र्यांनी दुपारी भेट देत शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यानंतर ते बोलत होते.

यावेळी पणन संचालक आणि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांच्यासह पणन सह संचालक विनायक कोकरे, पुणे बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड उपस्थित होते.

या महोत्सवात हापूस आंब्यांची विक्री प्रति डझनास ७०० ते १२०० रुपये दराने होत आहे. महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या जिल्ह्यातील ६२ हापूस आंबा उत्पादक सहभागी असून, ५१ स्टॉल आहेत.

३१ मेपर्यंत महोत्सव सुरू राहणार असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

दै. "ॲग्रोवन" दि. २३/४/२०२२.

# ‘सुगीपश्चात तंत्रज्ञान’ आता राज्य शिखर प्रशिक्षण संस्था

## राज्य सरकारची मान्यता; सहकारासह कृषी प्रशिक्षण मिळणार

**गणेश कोरे** : ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे** : सहकाराच्या बळकटीकरणाबरोबरच काढणीपश्चात तंत्रज्ञान बांधावर पोहचविण्यासाठी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणासाठी तळेगाव (जि. पुणे) येथील राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेला (एनआयपीएचटी) राज्य शिखर प्रशिक्षण संस्थेचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे राज्यातील निवडक संस्थांत आता ‘एनआयपीएचटी’चा समावेश झाला आहे. राज्य सरकारने या बाबतचा निर्णय घेतला आहे.



कृषी क्षेत्रातील काढणीपश्चात तंत्रज्ञानामुळे सुमारे २५ ते ३० टक्के शेतीमालाचे नुकसान होते. शेतकऱ्यांना ते टाळण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळातर्फे तळेगाव येथे ‘एनआयपीएचटी’ची स्थापना करण्यात आली. **पान ४ वर »**

**कृषी आणि सहकार ही दोन ग्रामविकासाची चाके आहेत. या दोन्हींच्या आधुनिक प्रशिक्षणासाठी राज्यातील महत्त्वाच्या निवडक संस्थांमध्ये आता ‘एनआयपीएचटी’चा समावेश झाला आहे. याचा फायदा कृषी, सहकार आणि ग्रामविकासाला कसा करता येईल, याचा प्रशिक्षण आराखडा आणि अंमलबजावणी केली जाईल.**

**– सुनील पवार**, कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ

## ‘सुगीपश्चात तंत्रज्ञान’ आता राज्य शिखर प्रशिक्षण संस्था

**» पान १ वरून**

या संस्थेत संरक्षित शेतीच्या विविध तंत्रज्ञानासह निर्यात आणि विपणनाचे प्रशिक्षण देण्यात येते. या संस्थेत आता सहकारातील विविध प्रशिक्षण देण्याची संमती राज्य सरकारने दिली आहे. संस्थेमध्ये अत्याधुनिक प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान उपलब्ध आहे.

‘एनआयपीएचटी’त नव्याने पुष्पोत्पादनासाठीचा ‘इंडो डच’ प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यातून विविध तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्यात येते. आता या पुढील काळात शेती बरोबरच सहकाराचे देखील प्रशिक्षण दिले जाईल.


**विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या ते जिल्हा सहकारी बँक आणि गृहनिर्माण सोसायट्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध अभ्यासक्रम राबविणार आहोत. तसेच पतसंस्था, बँका अधिक व्यावसायिक होण्यासंबंधीचे आधुनिक प्रशिक्षण दिले जाईल.**

**– डॉ. भास्कर पाटील**, संचालक, एनआयपीएचटी, तळेगाव दाभाडे

लोकमत

# आंबा महोत्सवात देवगड हापूसला मागणी

## महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने पुणे येथे आयोजन



पुणे येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने आयोजित केलेल्या महोत्सवात देवगड हापूस आंब्याचे स्टॉल उभारण्यात आले आहेत.

### बदलत्या वातावरणामध्ये आंबा परिपक्व होण्यास विलंब

वळीवाचा पाऊस, बदलत्या वातावरणामध्ये आंबा परिपक्व होण्यासाठी विलंब होत आहे. २६ ते २७ एप्रिलनंतर परिपक्व होणारा आंबा हा १० एप्रिल अगोदरच परिपक्व होणे गरजेचे होते. मात्र, वळीवाचा पाऊस, हवेमधील गारवा, असमतोल वातावरण यामुळे हापूस आंबा तयार होण्यास विलंब होत आहे. वाशी मार्केटमध्येदेखील देवगड हापूस आंबा कमी जात असल्यामुळे तेथील दलालवर्गाचेही फोन बागायतदारांना येत आहेत. वाशी मार्केटमध्ये सध्या ५ डझनी आंबा पेटीला अडीच ते साडेतीन हजार रुपये भाव मिळत असल्याचे सांगण्यात येत आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

देवगड : पुणे येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने १ एप्रिल ते ३० मे या कालावधीमध्ये आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये आंबा विक्रीचे ५१ स्टॉल उभारण्यात आले असून यामध्ये रत्नागिरी व देवगडमधील बागायतदारांचा समावेश आहे. या आंबा महोत्सवामध्ये सध्या देवगड हापूस आंब्याला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मात्र, सध्या कमी आंबा असल्यामुळे मागणीएवढा पुरवठा केला जाऊ शकत नाही. सध्या या स्टॉलमध्ये देवगड हापूस आंब्याची विक्री प्रति डझन ८०० ते १३०० रुपये दराने होत आहे.

यावर्षी देवगड हापूसचे उत्पादन हे ४५ ते ५० टक्केच असल्याचे बोलले जात आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये सुरुवातीच्या टप्प्यातील देवगड हापूस आंबा कलमांना मोहर आला होता. यानंतर डिसेंबर महिन्यामध्ये वळीवाच्या पावसाने थैमान घातले होते. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यातील मोहर येण्यास जानेवारी महिन्याची वाट पाहावी लागली. यामुळे नोव्हेंबर महिन्यामध्ये आलेल्या मोहरावरील आंबा तोडणी फेब्रुवारी, मार्च महिन्यामध्ये करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यातील मोहर जानेवारी महिन्यामध्ये आल्यामुळे एप्रिल महिन्यात देवगड हापूस आंबा कमी आहे. २७ एप्रिल ते १५ मे दरम्यान यावर्षीच्या एकूण उत्पादनापैकी ६० टक्के आंबा तोडणी केली जाणार आहे. यानंतरच सर्वसामान्य जनतेला आंबा मिळणार आहे.

पुणे येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने दरवर्षी १ एप्रिल ते ३० मे असा आंबा महोत्सव भरविला जातो. यावर्षी यात देवगड तालुक्यामधील ३१ स्टॉल व रत्नागिरी जिल्ह्यातील २० स्टॉलचा समावेश आहे.

दै. "पुण्यनगरी" दि. २०/४/२०२२.

देशातून दरवर्षी साधारणतः ५० हजार टन आंब्याची निर्यात होते. त्यातील ८० टक्के आंबा महाराष्ट्रातून निर्यात केला जातो. कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रातून विकसित देशांना निर्यात केला जातो. यामध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, दक्षिण कोरिया, युरोप आणि इंग्लंड येथे निर्यात केली जाते. विकसित देशांच्या विविध मागण्या आहेत. यामध्ये अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया यांना विकिरण प्रक्रिया क,न आंबा पाठविला जातो. जपान, न्यूझीलंड आणि दक्षिण कोरिया यांना वेपरहिट ट्रिटमेंट करून आंबा पाठविला जातो. तर, युरोपला पाठविताना आंब्यावर हॉट वॉटर ट्रिटमेंट केली जाते. या तीनही सुविधा कृषी पणन मंडळाकडे उपलब्ध आहेत. यंदा अडीच हजार मेट्रिक टनांचे निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**- सुनील पवार**

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ

*राज्यातील हापूस, केसर, कर्नाटकातील बैंगनपल्ली आणि उत्तर प्रदेशातील दशहरी, चौसा आदी प्रजातींच्या आंब्यांवर महाराष्ट्रात प्रक्रिया करून त्याची निर्यात केली जाते. निर्यातपूर्व प्रक्रियेसाठी कृषी हवामान विभागांमध्ये निर्यात सुविधा केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. या केंद्रांद्वारे विविध देशांच्या मागणीनुसार विविध प्रक्रिया करून आंबा निर्यात केला जातो.*

*आयातदार देशांच्या मागणीनुसार आंब्यावर विविध प्रक्रिया कराव्या लागतात. व्हेपर हीट ट्रिटमेंट, हॉट वॉटर ट्रिटमेंट आणि विकिरण आदी प्रक्रियांचा यात समोवश आहे. या माध्यमातून आंब्यामधील फळमाशी व कोय किडीचे निर्मूलन केले जाते.*

## मार्केटयार्डात होणारी आवक

नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात केरळमधून प्रथम लालबाग, हापूस, केरळ पायरी, बदाम, नीलम आणि तोतापुरीची आवक होते.

फेब्रुवारी ते जुन महिन्या दरम्यान रत्नागिरी आणि देवगड परिसरातून हापूस, पायरी, केशर, रत्ना, रायवळ यांची आवक होते.

एप्रिल ते जून महिन्यादरम्यान कर्नाटकातून कर्नाटक हापूस, पायरी, मलिका, रायवळ आणि बदाम या आंब्याची आवक होते.

तसेच गुजरातमधून केशर, हापूस, राजापुरी, लंगडा, दशेरी उत्तरप्रदेशातून दशेरी, लंगडा आणि चौसा यांची आवक होते.

पुणे जिल्ह्यातून गावरान हापूस, केशर, पायरी, रायवळ आणि गोटी आंब्याची आवक होते.



दै. "पुण्यनगरी"
दि. २०।४।२०२२.

# निर्यातीमुळे आंब्यास चांगला भाव मिळण्यास मदत

आंब्याची निर्यात मोठ्या प्रमाणात व्हावी यासाठी पणन मंडळाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. सद्यःस्थितीतही काही देशांमध्ये निर्यात झाली आहे. निर्यात झाल्यामुळे उत्पादकांनी उत्पादित केलेल्या आंब्यास चांगला दर मिळण्यास मदत होते. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या आंब्यास चांगला दर मिळावा यासाठी कृषी पणन मंडळ नेहमीच प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र राज्य कृषी व पणन मंडळाच्या माध्यमातून उत्पादक ते ग्राहक अशी विक्रीची व्यवस्था केली जाते. यामाध्यमातून उत्पादकांना चांगला भाव मिळतो. यंदा हवामानातील बदलामुळे आंब्याच्या उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे आंबा काही प्रमाणात बाजारपेठांमध्ये कमी प्रमाणात दाखल होत आहे. भारतातून अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अर्जेंटिना, इंग्लंड, जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, मॉरिशस, इराण, मध्यपूर्व आशियायी देश आणि युरोपमधील देशांत निर्यात केली जाते.

– **बाळासाहेब पाटील,** सहकार व पणनमंत्री

# 'पीजीआय'साठी मोठ्या प्रमाणात संघटितपणे प्रयत्न करा

## गणेश हिंगमिरे : केसर आंबा विषयावर चर्चासत्र

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

औरंगाबाद : केसर आंब्याला जीआय मानांकन मिळाले आता पीजीआयसाठी मोठ्या प्रमाणात संघटितपणे प्रयत्न करा असा सल्ला जी आय मानांकन मार्गदर्शक गणेश हिंगमिरे यांनी दिला.

मँगो ग्रोअर असोसीएशन, महाकेशर आंबा बागायतदार संघ, कृषी विभाग, राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता १६) केसर आंबा भौगोलिक मानांकन याचे फायदे व आव्हाने तसेच निर्यात व स्थानिक विक्री याविषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये श्री हिंगमिरे बोलत होते.

औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयाच्या रविंद्रनाथ टागोर सभागृहात झालेल्या या चर्चासत्राला, अतिरिक्त जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे अध्यक्षस्थानी होते. चर्चासत्राला जी आय मार्गदर्शक गणेश हिंगमिरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. तुकाराम मोटे, फळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. एम. बी. पाटील, निवृत्त उपविभागीय कृषी अधिकारी उदय देवळानकर, कृषी पणन मंडळाचे विभागीय अधिकारी के. सी. वाघ महाकेसर आंबा बागायतदार संघाचे अध्यक्ष सुशील बलदवा, मँगो ग्रोवर असोसिएशनचे अध्यक्ष अनिल परांजपे, सचिव त्र्यंबकराव पाथरीकर प्राचार्य अशोक तेजनकर, आदींची उपस्थिती होती.

श्री हिंगमिरे म्हणाले, ''मराठवाड्यातल्या ४१ केशर आंबा उत्पादक शेतकऱ्यांची नावे जीआय मानांकन यादीत आली आहेत. ही संख्या हजारापेक्षा जास्त व्हायला हवी. भौगोलिक मानांकन नोंदणीसाठी केसर आंबा उत्पादकांनी पुढे यायला हवे. पी जी आय प्राप्त झाल्यास चान्स टू चॉईस ची संधी आपल्याला उपलब्ध होईल.''

अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री गव्हाणे म्हणाले, ''जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्ष आंबा उत्पादकांना शक्य ती सर्व मदत करेल. मे च्या पहिल्या आठवड्यात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आंबा महोत्सव भरविण्यात येणार असल्याची माहिती वसंत देशमुख यांनी दिली.आभार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ मोटे यांनी मानले.''

Agrowon - Aurangabad 19/04/2022

दै. "[illegible]राष्ट्र टाईम्स" दि. १८/४/२[illegible]२.

# पुरंदरच्या अंजिरांची जर्मनीला निर्यात

## प्रायोगिक तत्त्वावर पाठविली १0 किलो फळे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे जिल्ह्यातील अंजिराचे आगार असलेल्या पुरंदर तालुक्यातून या फळाची थेट युरोपियन बाजारपेठेत निर्यात करण्यात आली आहे. पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्यूसर प्रा. लि. कंपनीने राज्य पणन मंडळाच्या माध्यमातून प्रथमच अंजिराच्या निर्यातीसाठी सातासमुद्रापार झेप घेतली आहे. प्रायोगिक तत्त्वावर १० किलो अंजिराची निर्यात झाली आहे.

पुरंदर तालुक्यात निर्यातक्षम आणि दर्जेदार अंजिराचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. मात्र, अंजिराची टिकवण क्षमता कमी असल्याने त्याला देशांतर्गतदेखील मोठी बाजारपेठ मिळत नव्हती; तर क्वचितच निर्यात होत होती. पुरंदर अंजिराला भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळाला आहे. मात्र 'जीआय'चा लाभ विपणनासाठी घेता येत नव्हता. आता निर्यातीची संधी मिळाल्याने भविष्यात निर्यात वाढल्यास अंजीर उत्पादक शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ खुली होणार आहे. भविष्यात पुरंदरचे अंजीर स्पेन, टर्की, दक्षिण अमेरिका आणि दक्षिण अफ्रिकेच्या अंजिरासोबत स्पर्धा करणार आहे, असा विश्वास आता व्यक्त होत आहे.

पुरंदर हायलँडचे अध्यक्ष रोहन उरसळ म्हणाले, 'पुरंदरचे शेतकरी एकत्र येऊन अनेक वर्षे अंजीर निर्यातीसाठी प्रयत्न करीत होतो. उत्पादनातील काही चुका सुधारून अंजिराच्या टिकवण क्षमतेवर काही वर्षे काम केले. पॅकिंगसाठी इस्राईलमधील स्टे-पॅक (पॅकेजिंग सोल्यूशन्स तज्ज्ञ), कोल्डमॅन लॉजिस्टिक आणि वेअरहाउस आणि शीतगृहातील बायर क्रॉप सायन्सच्या फूड चेन विभागासह चाचण्या घेतल्या. पॅकहाउसच्या चाचण्यांमध्ये विशिष्ट नियमावली तयार केल्यानंतर आणि त्याचे पालन केल्यावर पुरंदर अंजीर १५ दिवसांसाठी परिपूर्ण स्थितीत असल्याचे आढळले. या यशस्वी चाचण्यांमुळे पुरंदरमधील अंजीर आता जगभरातील कोणत्याही बाजारपेठेत पोहोचू शकतो हा आत्मविश्वास आला आणि पहिली प्रायोगिक निर्यात जर्मनी येथे करण्याचे ठरले.'

### 'जीआय' मानांकन बागांमधील अंजीराची निर्यात

सिंगापूर (ता. पुरंदर) मयूर लवांडे आणि सौरभ लवांडे यांच्या भौगोलिक मानांकन टॅग केलेल्या बागेतील अंजीर खरेदी करण्यात आले. या पॅकिंसाठी स्टेपॅकचे केतन वाघ यांनी इस्रायल येथून पॅकिंग साहित्य उपलब्ध करून दिले; तर 'बायर क्रॉप सायन्स'चे चेतन भोट यांनी युरोपासाठी आवश्यक तो निर्यात प्रोटोकॉल अंमलात आणून निर्यात यशस्वी केली. यासाठी शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक रामचंद्र खेडेकर, अतुल कडलग, गणेश कोलते, समिल इंगळे, सागर लवांडे, दीपक जगताप, यांच्यासह इतर संचालकांनी विशेष प्रयत्न केले.



> पणन मंडळाच्या वतीने राज्यातील विविध 'जीआय'प्राप्त उत्पादनांना बाजारपेठ आणि निर्यातवृद्धीसाठी योजना राबविण्याच्या सूचना पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिल्या होत्या. त्या योजनेच्या माध्यमातून पणन मंडळाच्या आर्थिक सहकार्याने पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून इतिहासात प्रथमच पुरंदरमधील ताजे अंजीर युरोपात यशस्वीपणे निर्यात करण्यात आले. हॅम्बर्ग, जर्मनी येथील बाजारपेठेत अंजिराची विक्री होत आहे.
>
> \- सुनील पवार, कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ

# वाशीतून अमेरिका, ऑस्ट्रेलियाला ११ टन हापूस आंब्यांची निर्यात



**रत्नागिरी :** कोरोनाचे निर्बंध शिथिल झाल्यानंतर वाशी, लासलगाव येथून अमेरिका, ऑस्ट्रेलियाला आंबा निर्यात सुरू झाली आहे; मात्र इंधनाचे दर वाढल्यामुळे हवाई वाहतुकीचे दर तिप्पट झाले आहे. त्याचा भुर्दंड व्यावसायिकांना बसणार आहे. मुंबईतील वाशी विक्री केंद्रातून ११ टन आंबे निर्यात झाले असून, त्यामध्ये साडेतीन टन हापूस अमेरिकेला आणि दीड टन ऑस्ट्रेलियाला गेला आहे.

अमेकिरेला आंबा पाठविताना विक्रीची प्रक्रिया बंधनकारक आहे. वाशी, लासलगाव या दोन ठिकाणी ही सुविधा उपलब्ध आहे. हंगाम सुरू करण्यापूर्वी अमेरिकेतील कृषी विभागाकडून विक्री केंद्रांची पाहणी करून सर्टिफिकेट दिले जाते. भारतामधून होणाऱ्या एकूण निर्यातीत वीस टक्के हापूसचा समावेश असतो. यंदा कोरोनाचे निर्बंध शिथिल झाल्यानंतर ४ एप्रिलला अमेरिकेच्या पथकाने वाशीसह लासलगाव केंद्रांची पाहणी करून हिरवा कंदील दिला. वाशीमधून ६ एप्रिलला १२०० किलो हापूस सर्वप्रथम हवाईमार्गे पाठविण्यात आला. आतापर्यंत वाशीतून ११ टन विविध प्रकारचे आंबे निर्यात केले गेले.

अमेरिकेला गेलेल्या ८ टन आंब्यांमध्ये ३.५ हापूस, ३ टन केसर आणि १.५ टन बदामीचा समावेश आहे. तर ऑस्ट्रेलियाला गेलेल्या ३ टनामध्ये १.५ टन हापूस, १.५ केशर आहे. गेल्या काही दिवसांमध्ये युक्रेन-रशिया युद्धामुळे इंधनाचे दर वाढले आहेत. त्याचा फटका हापूस निर्यातीलाही बसला आहे. विमानाने होणाऱ्या वाहतुकीसाठी किलोला ५५० रुपये आकारले जात आहे. हाच दर पूर्वी १७५ रुपये प्रतिकिलो होता. दरात तिप्पट वाढ झाल्याने त्याचा भुर्दंड व्यावसायिकांना बसला आहे.

> “अमेरिकेला हापूसची निर्यात सुरू झाली असून, वाशीमधून नियमित कन्साइनमेंट पाठवली जात आहे. यंदा जास्तीत जास्त १ हजार टन हापूस निर्यात करण्याच्या दृष्टीने नियोजन केले आहे.
>
> **– भास्कर पाटील,** सरव्यवस्थापक, पणन विभाग

> “आठवडाभरानंतर वाशी बाजारपेठेतील आवक थोडी वाढली आहे. स्थानिकपातळीवर हापूसचा दर वधारलेला असल्याने निर्यातीकडील कल कमी आहे. २५ एप्रिलनंतर मुबलक आंबा उपलब्ध होईल.
>
> **– संजय पानसरे,** वाशी बाजार समिती

Agrowon 16/04/2022

दै. "ॲग्रोवन" दि. २५/४/२०२२.

# शेतकऱ्यांनी ७७ बाजार समित्यांतून घेतले ५२ कोटींचे शेतमाल तारण कर्ज

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : कोरोना संकटात शेतमाल बाजारपेठ विस्कळित झाल्यामुळे शेतमालाचे दर पडले होते. कोरोना आणि शेतमालाचे कोसळलेले दर अशा दुहेरी संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांना पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेने काही प्रमाणात तारले. ऑक्टोबर २०२१ ते मार्च २०२२ या खरीप हंगामात ७७ बाजार समित्यांमधून ४ हजार ४४३ शेतकऱ्यांनी सुमारे ५२ कोटींचे शेतमाल तारण कर्ज घेतल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

राज्य कृषी पणन मंडळाद्वारे १९९० पासून शेतमाल तारण कर्ज योजना विविध बाजार समित्यांमधून राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे शेतमालाच्या किमतीच्या ७५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत सहा टक्के व्याजाने कर्ज स्वरूपात दिली



जाते. याचा लाभ अन्नधान्य उत्पादक शेतकरी घेत आहेत.

या योजनेअंतर्गत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, हरभरा, भात, करडई, ज्वारी, बाजरी, मका, घेवडा, काजू बी, बेदाणा, सुपारी, हळद आदींचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत व्याजावरील ३ टक्के व्याज सवलत पणन मंडळाद्वारे बाजार समित्यांना दिली जाते. तसेच एखाद्या बाजार समितीकडे स्वनिधी नसेल तर अशा बाजार समित्यांना पणन मंडळाद्वारे ५ लाखांचा अग्रिम दिला जातो. असेही पवार यांनी सांगितले.

दै. "ॲग्रोवन" दि. १५।७।२०२२.

# पुरंदरच्या अंजिराची युरोपात निर्यात

## कृषी विभाग, पणन मंडळ आणि पुरंदर हायलॅंडचे प्रयत्न

**गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

**पुणे** : आपल्या वैशिष्ट्यपूर्ण चवीसाठी प्रसिद्ध असलेले पुरंदर (जि. पुणे) तालुक्यातील अंजिराच्या युरोपातील निर्यातीच्या प्रयोगाला यश आले आहे. प्रयोगासाठी १० किलो अंजीर यशस्वी निर्यात झाली आहे. कृषी विभाग, राज्य कृषी पणन मंडळ आणि पुरंदर हायलॅन्ड शेतकरी उत्पादक कंपनीच्या संयुक्त प्रयत्नांतून हा प्रयोग राबविण्यात आला. इतिहासात प्रथमच अंजिराच्या निर्यातीचा यशस्वी प्रयोग झाल्याने, भविष्यात



निर्यात वाढल्यास अंजीर उत्पादक शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ खुली होणार आहे. निर्यात वाढल्यास भविष्यात पुरंदरचे अंजीर स्पेन, टर्की, दक्षिण अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या अंजिरासोबत स्पर्धा करणार आहे.

अंजीर निर्यात प्रयोगाची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी ॲग्रोवनला दिली. पवार म्हणाले, '' पुरंदर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर निर्यातक्षम आणि दर्जेदार अंजिराचे उत्पादन होते.

**पान ४ वर »**

**" या यशस्वी चाचण्यांमुळे पुरंदरमधील अंजीर आता जगभरातील कोणत्याही बाजारपेठेत पोहोचू शकतो हा आत्मविश्वास आला आणि चाचणी कन्साईनमेंट जर्मनी येथे पाठविण्याचे ठरले.**

**– रोहन उरसळ,** अध्यक्ष, पुरंदर हायलॅंड

# पुरंदरच्या अंजिराची युरोपात निर्यात

» पान १ वरून

मात्र या अंजिराच्या टिकवण क्षमता कमी असल्याने त्याला देशांतर्गत देखील मोठी बाजारपेठ मिळत नव्हती. तर क्वचितच निर्यात होत होते. तर बहुतांश अंजिराची आयातच केली जाते. पुरंदर अंजिराला भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळाला आहे. मात्र, या जीआयचा लाभ विपणनासाठी घेता येत नव्हता. कृषी पणन मंडळाच्या वतीने राज्यातील विविध जीआय प्राप्त उत्पादनांना बाजारपेठ आणि निर्यातवृद्धीसाठी योजना राबविण्याच्या सूचना पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिल्या होत्या.''

त्या योजनेच्या माध्यमातून पणन मंडळाच्या आर्थिक सहकार्याने इतिहासात प्रथमच पुरंदर येथील ताजे अंजीर पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून युरोपात यशस्वी निर्यातीचा प्रयोग करण्यात आला असून, हॅम्बर्ग, जर्मनी येथील बाजारपेठेत विक्री होत आहे, असेही पवार यांनी सांगितले.

पुरंदर हायलँडचे अध्यक्ष रोहन उरसळ म्हणाले, ''आम्ही पुरंदरचे शेतकरी एकत्र येऊन अनेक वर्षे अंजीर निर्यातीसाठी प्रयत्न करत होतो. यासाठी आम्ही उत्पादनातील काही चुका सुधारत अंजिराची टिकवण क्षमता वाढीवर दोन वर्षे काम केले. यासाठी आम्ही विविध हंगामातील खत, पाणी, कीटकनाशके फवारणींसह काढणी तंत्रज्ञानात बदल केले. तसेच पॅकिंगसाठी इस्राईल मधील स्टे-पॅक (पॅकेजिंग सोल्यूशन्स तज्ज्ञ), कोल्डमॅन लॉजिस्टिक आणि वेअरहाऊस आणि शितगृहातील बायर क्रॉप सायन्सच्या फूड चेन विभागासह चाचण्या घेतल्या. पॅकहाऊसच्या चाचण्यांमध्ये विशिष्ट प्रोटोकॉल तयार केल्यानंतर आणि त्याचे पालन केल्यावर पुरंदर अंजीर १५ दिवसांसाठी परिपूर्ण स्थितीत असल्याचे आढळले.

## 'जीआय' अंजिराची निर्यात

सिंगापूर (ता. पुरंदर) मयूर लवांडे आणि सौरभ लवांडे यांच्या भौगोलिक मानांकन टॅग केलेल्या बागेतील अंजीर खरेदी करण्यात आले. या पॅकिंगसाठी स्टेपॅकचे केतन वाघ यांनी इस्राईल येथून पॅकिंग मटेरिअल मागवून उपलब्ध करून दिले. तर बायर क्रॉप सायन्सचे चेतन भोट यांनी युरोपकरिता आवश्यक तो निर्यात प्रोटोकॉल अमलात आणून निर्यात यशस्वी केली. यासाठी शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक रामचंद्र खेडेकर, अतुल कडलग, गणेश कोलते, समिल इंगळे, सागर लवांडे, दीपक जगताप, यांच्यासह इतर संचालकांनी विशेष प्रयत्न केले.

हॅम्बर्ग, जर्मनी येथे असलेल्या पिल्झ शिंडलर जी.एम.बी.एच. यांना पाठवलेली चाचणी शिपमेंट यशस्वी झाली. अंजीर सदर बाजारपेठेत उत्कृष्ट स्वरूपात पोहचले. खरेदीदारांनी त्याची चव घेऊन कौतुक केले. या सर्व उपक्रमामध्ये कृषी आयुक्त धीरज कुमार यांनी विविध चाचण्या कृषी विभागांकडून उपलब्ध करून दिल्या. तर पणन मंडळाच्या निर्यात विभागाचे प्रमुख सतीश वराडे यांनी विविध चाचण्या आणि परवानग्या मिळविण्याकरिता सहकार्य केल्याचे उरसळ यांनी सांगितले

## दृष्टीक्षेपात अंजीर

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, आणि तमिळनाडू या राज्यात अंजीर फळाचे उत्पादन घेतले जाते. महाराष्ट्रात सुमारे ४०० हेक्टरवर अंजिराची लागवड असून त्यामधून सुमारे ४ हजार ३०० टन एवढ्या ताज्या अंजिराचे उत्पादन होते. यापैकी सुमारे ९०-९२ टक्के अंजिर फळपिकाचे उत्पादन पुणे जिल्ह्यात होत असून, त्यामधील सर्वाधिक उत्पादन पुरंदर भागात मोठ्या प्रमाणावर आहे. या भागातील पूना अंजीर हा भारतातील सर्वोत्कृष्ट वाण मानला जातो.

दै. "लोकसत्ता" दि. १३/४/२०२२.

# हापूस निर्यातीला इंधन दरवाढीच्या झळा

## निर्यातीत यंदा पन्नास टक्के घटीची शक्यता

**दत्ता जाधव, लोकसत्ता**

**पुणे :** इंधन दरवाढीमुळे हवाई मार्गाने होणारी आंब्याची निर्यात अडचणीत आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत निर्यातीचा खर्च जवळपास दुप्पट झाला आहे. स्थानिक पातळीवर नैसर्गिक आपत्तींचाही हापूस उत्पादनाला फटका बसत आहे. त्यामुळे यंदा आंबा निर्यातीत पन्नास टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे.

यंदाच्या हंगामात आंब्याला दोनतीन टप्प्यात मोहोर आला आहे. पहिल्या टप्प्यातील आंब्यांचे थंडी, धुके आणि अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. आता दुसऱ्या टप्प्यातील आंबा बाजारात येण्यास सुरुवात होईल. सध्या निर्यात सुरू झाली असली तरी गती आलेली नाही. एप्रिलच्या अखेरीपासून निर्यातीला गती येईल. स्थानिक बाजारात डझनाला ८००-१००० रुपये दर मिळत असल्यामुळे आणि आंब्याची आवक कमी असल्यामुळे शेतकरी, व्यापाऱ्यांचा अद्याप निर्यातीवर भर नाही. बाजारात आंब्याची आवक वाढली, की निर्यातीला गती येईल.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कोकण विभागाचे उप सरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, हापूसच्या अमेरिका वारीवर अनेक मर्यादा असतात.



> **नैसर्गिक आपत्तींचा विपरीत परिणाम हापूस उत्पादनावर होत आहे. मागील काही वर्षांपासून अवकाळी पाऊस, गारपिटीसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पणन मंडळाकडून शेतकऱ्यांना निर्यातीबाबतचे प्रशिक्षण दिले जात आहे. शेतकऱ्यांनी शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करून निर्यातीसाठी पुढाकार घ्यावा. मुंबईत वाशी मार्केटमध्ये अद्ययावत निर्यातीसाठी अत्याधुनिक सोयी-सुविधांची निर्मिती केली आहे, त्याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.**
>
> **- डॉ. भास्कर पाटील,** कोकण विभागाचे उप सरव्यवस्थापक, पणन महामंडळ

> **नैसर्गिक आपत्तींचा परिणाम म्हणून यंदा हापूस उत्पादनात तब्बल ५० ते ६० टक्क्यांपर्यंत घट येणार आहे. पहिल्या टप्प्यात मोहोर आलेला हापूस आता संपला आहे. दुसऱ्या टप्प्यातील हापूस एप्रिलअखेर बाजारात येईल. यंदा निर्यातही पन्नास टक्क्यांपर्यंत घटणार आहे. पाडव्याला मुंबईतील वाशी मार्केटमध्ये सुमारे सव्वालाख पेटी आंबा विक्रीसाठी जातो. यंदा फक्त २० हजार पेटीच आंबा विक्रीसाठी उपलब्ध होता. आंबा उत्पादनात आलेल्या मोठ्या घटीमुळे उत्पादकांचे आर्थिक गणित बिघडले आहे.**
>
> **- विवेक भिडे,** अध्यक्ष, कोकण हापूस उत्पादक आणि विक्रेता संघ

देशातून हापूससह विविध प्रकारच्या सुमारे ५० हजार टन आंब्यांची निर्यात होते. त्यात केसर सर्वाधिक ५० टक्के, कोकणचा हापूस फक्त दहा-अकरा टक्के असतो. कोकणातून दरवर्षी सरासरी ७-८ हजार टन हापूस निर्यात होतो. त्यापैकी अमेरिकाला जाणारा हापूस फक्त १००० ते १२०० टनांच्या आसपास असतो. इतर युरोपीयन देश, आखाती देश, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया यांनाही हवाई मार्गानेच निर्यात होते.

दै. "पुढारी"
दि. ११/४/२०२२.



# शेतकऱ्यांना ५३ कोटींचे वाटप

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतमाल तारण कर्ज योजनेतून शेतकऱ्यांना सुमारे ५२ कोटी ९७ लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

कोविडच्या संकटाच्या स्थितीतही मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजना शेतकऱ्यांना लाभदायी ठरल्याची माहिती राज्याचे पणन संचालक आणि मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली. योजनेत साडेचार हजार शेतकऱ्यांचा शेतमाल आहे. त्यामध्ये उडीद, गहू, ज्वारी, तूर, बेदाणा, भात-धान, मका, मूग, सूर्यफूल, सोयाबीन, हरभरा, हळदीचा मिळून २ लाख ६ हजार ४९६ क्विंटल इतका शेतमाल साठवणूक केला आहे.

सोयाबीनची सर्वाधिक १ लाख ६० हजार ५११ क्विंटल इतकी शेतमालाची साठवणूक केल्याचे त्यांनी सांगितले. सहा महिन्यांच्या आत ज्या कर्जाची परतफेड करतात, अशा बाजार समित्यांना तीन टक्के व्याज सवलत पणन मंडळाकडून दिली जाते.

दै. "ॲग्रोवन" दि. ८/४/२०२२.

# रत्नागिरी हापूस ॲमेझॉनवरही!

## प्रतिडझन ९०० रुपयांनी खरेदी; संकलन केंद्राचे उद्घाटन

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

रत्नागिरी : विविध वस्तूंबरोबरच रत्नागिरी हापूसही ऑनलाइन मार्केटिंग करणाऱ्या कंपन्यांकडून विक्री केला जात आहे. त्यात ॲमेझॉन कंपनीही उतरली आहे. थेट बागायतदारांकडून आंबा खरेदीला ॲमेझॉनने सुरुवात केली आहे.

रत्नागिरीतील मिरजोळे एमआयडीसीमध्ये आंबा संकलन केंद्र चालू केले असून, आरंभीलाच १२ शेतकऱ्यांकडून ६०० डझन आंब्याची खरेदी केली आहे. १८५ ते २२० ग्रॅमपर्यंतचे पिकलेले फळ प्रतिडझन ९०० रुपयांनी खरेदी करण्यात आले.रत्नागिरीतील आंबा संकलन केंद्राचे उद्घाटन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक मिलिंद जोशी, आंबा बागायतदार समीर दामले, प्रमुख व्यवस्थापक राजेश प्रसाद, विवेक धवन, सुजय हेगडे, नरेंद्र जवळे, श्री. कल्पेश यांच्यासह बागायतदार उपस्थित होते. हे ॲमेझॉनचे महाराष्ट्रातील चौथे, तर भारतातील सातवे संकलन केंद्र आहे. येथे आंबा बागायतदारांकडून आंबा विकत घेऊन मुंबई, तसेच पुणे येथील ॲमेझॉनच्या ग्राहकांना पोहोचवला जाणार आहे. भविष्यात देशाच्या कानाकोपऱ्यात निर्यातही केला जाणार आहे.

आंबा खरेदी केल्यानंतर बागायतदाराला त्वरित पैसे दिले जाणार आहेत. तसेच आंबा बागायतदार राजेश पालेकर यांच्या सूचनेनुसार पुढील आठवड्यापासून बिटकी आंबाही खरेदी केला जाईल असे प्रतिनिधींकडून सांगण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी श्री. जोशी म्हणाले, की कोरोना ही बागायतदारांसाठी इष्टापत्ती ठरली आहे. अनेकांनी दलालांवर अवलंबून न राहता थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले.



**“ हापूसला चांगला दर मिळवून देत असतानाच बागायतदारांना गुणवत्तापूर्ण उत्पादन घेण्यासाठी आवश्यक खते, औषधे, साहित्य ॲमेझॉनच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी ॲप विकसित केले जाणार आहे. पुढील वर्षी वेगळ्या पद्धतीने यावर काम करू. फक्त हापूसची खरेदी हे लक्ष ठेवता वेगळ्या पद्धतीने विचार करत आहोत.**

**– राजेश प्रसाद,**
प्रमुख व्यवस्थापक, ॲमेझॉन

दै. "अॅग्रोवन" दि. ६।४।२०२२.

# पुणे बाजार समितीच्या उत्पन्नात २१ टक्के वाढ

## मागील पाच वर्षांच्या तुलनेतील स्थिती



अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : फळे भाजीपाला नियमनमुक्तीनंतर बाजार समित्यांच्या उत्पन्नात घट होण्याची भीती व्यक्त होत आहे. मात्र पुणे बाजार समितीच्या उत्पन्नात गेल्या ५ वर्षांच्या तुलनेत या आर्थिक वर्षात २१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात बाजार समितीच्या तिजोरीत ५१ कोटी ५६ लाखांचा महसूल बाजार शुल्क आणि इतर उत्पन्नातून जमा झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत १४ कोटींनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी ३८ कोटी ४२ लाखांचे उत्पन्न मिळाले होते. हा महसूल बाजार समितीच्या इतिहासात सर्वाधिक आहे, अशी माहिती प्रशासक मधुकांत गरड यांनी दिली.

| गेल्या पाच वर्षांचे विभागनिहाय | सरासरी उत्पन्न (सुमारे) | या वर्षी झालेली वाढ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| गूळ भुसार | १८ कोटी | २१ कोटी ५९ लाख | २१ टक्के वाढ |
| फळेभाजीपाला | १९ कोटी ५६ लाख | २३ कोटी ७६ लाख | २० टक्के वाढ |
| पिंपरी उपबाजार | ९५ लाख | १ कोटी | ५.५ टक्के |
| खडकी उपबाजार | १० लाख | ११ लाख ४० हजार | ४ टक्के |
| भरारी पथक | १ कोटी ५ लाख | १ कोटी ७८ लाख | १९ टक्के |
| पानबाजार | ५ लाख ९१ हजार | ६ लाख | २.८ टक्के |
| फुलबाजार | १ कोटी २५ लाख | १ कोटी ५८ लाख | १९ टक्के |
| जनावर बाजार | ३ लाख ५० हजार | १ लाख ९० हजार | उणे ४६ टक्के घट |
| केळी बाजार | ४५ लाख | ६१ लाख ६३ हजार | २३ टक्के |
| मांजरी उपबाजार | ८९ लाख | १ कोटी ४० लाख | ५७ टक्के |
| मांजरी फुलबाजार | ५ लाख | ६ लाख | २ .३ टक्के वाढ |
| उत्तमनगर उपबाजार | ३१ हजार | १८ हजार ४०० | उणे ४१ टक्के घट |
| मोशी उपबाजार | ६९ लाख | १ कोटी ७५ लाख | १४५ टक्के वाढ |

गरड म्हणाले, ''गेल्या वर्षीपासून दर महिन्याला सेस भरला जात आहे. उत्पन्नात वाढ झाली. दंड आकारण्याच्या परिपत्रकामुळे सेसचा नियमित भरणा झाला.''

दै. "अॅग्रोवन" दि. ४।४।२०२२.

# 'जीआय'च्या नावाखाली बनावट शेतीमाल विकल्यास गुन्हा

## पणन संचालकांचे बाजार समित्यांना आदेश



गणेश कोरे : अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : भौगोलिक निर्देशांक प्राप्त शेतीमालाच्या नावाखाली बनावट शेतीमाल विकणाऱ्यांना आता चाप बसणार आहे. अशा प्रकारांमध्ये शेतकरी आणि ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी बाजार समित्यांनी सतर्क राहून संबंधितांवर कारवाई करण्याच्या आदेशाबरोबरच विविध उपाययोजना करण्याच्या मार्गदर्शक सूचना पणन संचालक सुनील पवार यांनी सर्व बाजार समित्यांना दिल्या आहेत.

पान २ वर »

### जीआय प्राप्त उत्पादनांसाठीची कार्यवाही

- जीआय उत्पादनांची माहिती त्यांच्या वैशिष्ट्यांद्वारे ग्राहकांपर्यंत पोहोचविणे
- जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या बागा जीआय अंतर्गत नोंद करणे
- प्रभावी आणि आकर्षक पॅकिंग आणि ब्रँण्डिंग करणे
- बागा आणि उत्पादनांचा क्यूआर कोड तयार करणे.
- वेबसाइटवर जीआय नोंदणीधारक बागा आणि शेतकऱ्यांची यादी जाहीर करणे.
- विपणनासाठी बायर सेलर मीट आणि प्रदर्शने आयोजित करणे

'जीआय'च्या नावाखाली बनावट शेतीमाल विकल्यास गुन्हा

» पान १ वरून

याबाबत पणन संचालक श्री. पवार म्हणाले, "महाराष्ट्र वैविध्यपूर्ण विविध कृषी हवामान विभागांसाठी प्रसिद्ध आहे. यामुळे विविध विभागातील हवामानस्थितीमुळे शेतमाल उत्पादनांना वैशिष्ट्यपूर्ण चव, रंग, सुगंध प्राप्त झाले आहेत. अशा विविध उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी जागतिक पातळीवर भौगोलिक निर्देशांकांची मागणी होऊ लागली आहे. यानुसार राज्यातील २६ उत्पादनांना भौगोलिक निर्देशांक प्राप्त झाले आहेत. या उत्पादनांची स्वतंत्र ओळख निर्माण होण्यासाठी यांच्या नावाने इतर उत्पादनांची होणारी विक्री रोखत, शेतकरी आणि ग्राहकांची फसवणूक टाळणे गरजेचे आहे. यासाठी सर्व बाजार समित्या आणि विविध शेतकरी गट, उत्पादक कंपन्या, संघ यांना याबाबतच्या सूचना आणि करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली आहे."

### बाजार समित्यांची जबाबदारी


बाजार आवारात विक्री होत असलेला शेतीमाल ज्या राज्यातून आवक झाला असेल त्याच राज्याच्या नावाने विक्री होत असल्याची खात्री करणे. तसे होत नसेल तर संबंधित विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई करावी. याबाबत संबंधित सर्व बाजार घटकांना याबाबत सूचना द्याव्यात.

### आंबा विक्रीत मोठी फसवणूक

सध्या आंब्याचा हंगाम सुरू झाला असून, आंबा विक्रीत मोठी फसवणूक होत असल्याच्या घटना आणि तक्रारी बाजार समित्यांकडे होत आहे. पुणे बाजार समितीमध्ये नुकतेच केरळचा आंबा कोकण हापूस नावाने विक्री होत असल्याचे बाजार समितीच्या निदर्शनास आल्यानंतर बाजार समितीने केरळचा आंबा जप्त केला होता. असाच प्रकार कर्नाटकाचा आंबा कोकण हापूसच्या नावाच्या बॉक्समधून विक्री होत आहे. तर अनेक वेळा कोकणीतील वृत्तपत्रांच्या रद्दीमध्ये कर्नाटक, केरळचा आंबा वेष्टण करून, कोकणचा हापूस भासवितात आणि ग्राहकांची फसवणूक होते.

दै. "लोकसत्ता"
दि. १/४/२०२२.

# मार्केट यार्डात आंबा महोत्सव



लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजने अंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव गुलटेकडी येथील मार्केट यार्डाच्या प्रवेशद्वार क्रमांक नऊ येथील पीएमपी बस आगाराच्या समोरील वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेत १ एप्रिलपासून ३१ मेपर्यंत सुरू राहणार आहे. पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार म्हणाले, की या महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादक सहभागी होणार आहेत. केशर आंबा उत्पादकही महोत्सवात सहभागी होतील. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, आतापर्यंत ५१ स्टॉल धारकांनी नोंदणी केली आहे. गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर जास्तीत-जास्त पुणेकरांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा.

दै. "ॲग्रोवन" दि. १/४/२०२२.

# पणन सुधारणांना अखेर राज्यपालांची मान्यता

## अधिसूचना जारी; बाजार समित्यांचे देखरेख शुल्क दुप्पट

**गणेश कोरे :** ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्य कृषी उत्पन्न पणन कायदा १९६३ मधील मतदान अधिकार, प्रशासकीय मंडळ संख्या, बिगर शेतीमालावरील आकार, सचिव पॅनेल, कर्जवसुली आदी प्रस्तावित पणन सुधारणांना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मान्यता दिली आहे. याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून, पणन संचालनालयाद्वारे याबाबतचे नियम शासनाला पाठविणार आहे.



यानंतर शासन विधी व न्याय विभागाची मंजुरी घेऊन, त्याची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे पणन मंत्रालयातील सूत्रांनी सांगितले.

पान ४ वर »

### ...या आहेत सुधारणा

- पीककर्ज वापट करणाऱ्या बहुद्देशीय संस्थेचा सदस्यच बाजार समितीच्या शेतकरी संचालक निवडीसाठी मतदान करणार
- बाजार समितीच्या प्रशासकीय मंडळाची संख्या सात एवढी निर्धारित होणार. (जुन्या कायद्यात संख्येवर मर्यादा नव्हती)
- बिगर शेतीमालाच्या खरेदी विक्रीवर वापर आकार पणन संचालकांच्या मान्यतेने आकारला जाणार.
- बाजार समिती देखरेख खर्च ५ पैशांवरून १० पैसे होणार
- सचिव नियुक्तीसाठी पॅनेलची अट रद्द.
- बाजार समित्यांना पणन मंडळामार्फत देण्यात आलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी मंडळाला अधिकार.

# पणन सुधारणांना अखेर राज्यपालांची मान्यता

» पान १ वरून

फळेभाजीपाला नियमनमुक्तीनंतर आता केंद्र सरकारने संपूर्ण शेतीमाल (अन्नधान्य) नियमनमुक्तीकडे वाटचाल सुरू आहे. यासाठी तीन कृषी कायदेदेखील केले होते. मात्र या कायद्यांना शेतकऱ्यांच्या आंदोलनाने आणि मोठ्या विरोधानंतर मागे घ्यावे लागले. केंद्राच्या धर्तीवर राज्याचा पणन कायद्यातील काही तरतुदीत परिस्थितीनुसार बदल करणे अपेक्षित होते. मंत्रिगटाच्या शिफारशीनंतर याकरिता पणन संचालनालयातर्फे सुधारणा मसुदा तयार करण्यात आला. या मसुद्यास मंत्रिमंडळ मान्यतेनंतर विधानसभेच्या नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात मंजुरी देण्यात आली. अधिसूचना काढण्यासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना मसुदा ७ जानेवारी २०२२ सादर करण्यात आला. मात्र त्यांच्या मान्यतेअभावी रेंगाळल्या होत्या आणि अधिसूचना काढणे लांबले आहे.

नव्याने येऊ घातलेल्या केंद्राच्या कायद्यामुळे बाजार समित्यांचे उत्पन्न कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे बाजार समित्यांचे उत्पन्न वाढी बरोबरच अस्तित्व अबाधित राखण्यासाठी राज्य सरकारने कायद्यामध्ये विविध बदल केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने बाजार देखरेख शुल्कात दुपटीने वाढ करणे, बाजार आवारातील बिगर शेतीमालावरील खरेदी विक्रीवर कर लावणे आदी विविध बदलांसह बाजार समित्यांच्या प्रशासकीय मंडळाच्या सदस्य संख्येवर नियंत्रणासाठी देखील कायद्यात बदल करण्यात आला आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. १/४/२०२२.

# आंबा महोत्सव आजपासून

## पणन मंडळाच्या पुढाकाराने अस्सल हापूस मिळणार रास्त दरात

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : कोरोना संकटामुळे गेली दोन वर्षे बंद असलेल्या पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचा गुढीपाडव्याला प्रारंभ होणार आहे, अशी माहिती मंडळाचे सरव्यवस्थाक दीपक शिंदे यांनी दिली.

मार्केट यार्ड येथील पीएमटीच्या बस डेपो शेजारील पटांगणावर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ३१ मेपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत खुला असणार आहे.

'शेतकरी ते ग्राहक' थेट शेतीमाल विक्री योजनेअंतर्गत पणन मंडळाच्या वतीने गेली



अनेक वर्षांपासून आंबा महोत्सवाचे आयोजन केले जाते. मात्र कोरोना संकटामुळे गेली दोन वर्षे हा महोत्सव होऊ शकला नव्हता. या वर्षीचा महोत्सव मोठ्या उत्साहात सुरू होत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

सध्या बाजारपेठेत कोकण हापूस आंब्याच्या नावाखाली केरळ, कर्नाटक येथील आंब्याची विक्री होत असल्याचे समोर आले आहे. यामुळे ग्राहकांना अस्सल कोकण हापूस आंबा महोत्सवात बाजारपेठेच्या तुलनेत रास्त दरात उपलब्ध होणार असल्याचे ग्राहकांनी महोत्सवातून आंबा खरेदी करावा, असे आवाहन शिंदे यांनी केले आहे.

**५१ स्टॉलची उभारणी**

देवगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ५१ स्टॉलचे वाटप करण्यात आले असून, महोत्सवामध्ये आंब्याशिवाय प्रक्रिया पदार्थ देखील उपलब्ध असणार असल्याचे महोत्सव प्रमुख मंगेश कदम यांनी सांगितले.

दै. "सकाळ" दि. १/४/२०२२.

# मार्केट यार्डमध्ये आजपासून आंबा महोत्सवास प्रारंभ

**पुणे, ता. ३१ :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेंतर्गत 'आंबा महोत्सवाचे' आयोजन शुक्रवारपासून (ता. १) गुलटेकडी मार्केट यार्ड येथे करण्यात आले आहे, अशी माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. कोरोनामुळे गतवर्षी महोत्सवाचे आयोजन करता आले नाही. तथापि यावर्षी पुण्यासह राज्यभरात आंबा महोत्सवांचे आयोजन करण्याच्या सूचना सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिल्या होत्या. पणन राज्यमंत्री शंभुराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सव आयोजनास पुण्यापासून सुरवात करण्यात येत आहे. सुरूवातीस रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादक यामध्ये सहभागी होणार आहेत. हा महोत्सव गुलटेकडी, मार्केटयार्डच्या प्रवेशद्वार क्रमांक ९ येथील पीएमपी बस डेपोसमोरील वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेत सुरू करण्यात येत आहे. महोत्सव ३१ मेपर्यंत सुरू राहणार आहे. नागरिकांनी या महोत्सवास भेट देऊन थेट उत्पादकांकडून आंबा खरेदीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी केले आहे.

दै. "पुढारी" दि. १ एप्रिल २०२२.

पुढारी

# पणन मंडळाचा आंबा महोत्सव आजपासून

पुणे : पुढारी वृत्तसेवा

'राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक विक्री योजनेंतर्गत चालूवर्षीच्या आंबा महोत्सवास शुक्रवारपासून (दि. १) सुरुवात होत आहे,' अशी माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

कोकणातील हापूस आंब्यांसह केशर आंबा उत्पादक शेतकरीही महोत्सवात सहभागी होत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्राहकांच्या सोईसाठी मार्केट यार्डातील प्रवेशद्वार क्रमांक ९ येथील पीएमटी बस डेपोसमोरील वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेत आंबा महोत्सव सुरू करण्यात येत आहे. पणन मंडळाकडे बहुतांशी हापूस व केशर आंबा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामध्ये सुमारे ५१ स्टॉल आंबा उत्पादकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महोत्सवाचा कालावधी १ एप्रिल ते ३१ मेअखेर राहणार आहे. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा माल मिळावा या उद्देशाने महोत्सवाचे आयोजन सन २००२पासून करण्यात येते. रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांतील हापूस आंबा उत्पादकांचा सहभाग पुण्यातील महोत्सवात राहील. तसेच हंगामानुसार पुढे केशर आंबा उत्पादकही सहभागी होणार आहेत. दरम्यान, गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर जास्तीत जास्त पुणेकरांनी आंबा महोत्सवास भेट देऊन थेट आंबा उत्पादकांनी उपलब्ध केलेल्या आंब्यांची खरेदी करण्याचे आवाहन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी केले आहे.

**राज्यभर आंबा महोत्सव भरविणार...**

कोरोना महामारीमुळे मागील वर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करता आले नाही. तथापि, चालूवर्षी राज्यभर आंबा महोत्सवाचे आयोजन करण्याच्या सूचना सहकार व पणन मंत्री तसेच पणन मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनी दिल्या आहेत. पणन राज्यमंत्री व मंडळाचे उपाध्यक्ष शंभुराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यापासून आंबा महोत्सवास सुरुवात करण्यात येत आहे.

## निधन वार्ता



### पवनलाल गुगळे

शिरूर : येथील प्रसिध्द व्यापारी पवनलाल चुनीलाल गुगळे (वय ५९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, तीन भाऊ असा परिवार आहे. किराणा व्यापारी वृषभ गुगळे यांचे ते वडील तर व्यावसायिक विजय गुगळे, अभय गुगळे व अजित गुगळे यांचे ते बंधू होत.